## अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०३ ची साक्ष

**मी याव्दारे शपथपुर्वक निवेदन करतो की,**

माझे नाव – परमानंद आत्माराम टेंबुलकर वय – ३० वर्षे,
व्यवसाय – शेती
रा. – टेंबवली, ता. देवगड

## शपथेवर सरतपासणी सरकारतर्फे सहा.सरकारी अभियोक्ता श्री. एम.जी. काळदाते यांचे मार्फत.

०१. घटना दोन वर्षापुर्वी रात्री १०.१५ वा. झाली होती. त्यावेळेस मी घरी होतो. त्यावेळेस माझा भाऊ रस्त्यावर वरती बाईकची चावी विसरुन आला होता. ती आणण्या करिता तो परत वर गेला. तेथून पाच–दहा मिनटांनी आम्हाला बोंबाटण्याचा आवाज आला. त्यानुसार मी स्वत:, माझी आई, वडील तिघेही वर गेलो. तेथे सागर टेंबुलकर, आशिष टेंबुलकर व त्याचा काका शंभुधर टेंबुलकर होते. सागर टेंबुलकर हा टॉर्च डोळयावर मारुन माझ्या भावाला लाकडी फळीने मारत होता. आम्ही भावाला सोडावून घेतले. तरी देखील सागर टेंबुलकर शिवीगाळ करत होता. आशिष टेंबुलकर व त्याचा काका शंभुधर टेंबुलकर हे देखील शिवीगाळ करत होते. त्यानंतर शंभुधर टेंबुलकर हा आमच्या घरी येऊन आम्हाला जिवे मारण्याची धमकी देऊ लागला. त्यानंतर आनंद टेंबुलकर याने पोलीस स्टेशन देवगड येथे तक्रार दाखल केली. माझ्या भावाचे नाव आनंद आत्माराम टेंबुलकर असे आहे. ज्या फळीने माझ्या भावाला मारत होते ती फळी दाखविल्यास मी ओळखू शकतो. आता मला एम.ओ.नं.१ येथील फळी दाखविण्यात आली. ती तीच आहे. आरोपी यांना पाहिल्यास मी ओळखू शकतो. आरोपी क्र.१ ते ३ न्यायालयात उपस्थित आहेत.

सरतपास पूर्ण.

## आरोपी क्र.१ ते ३ तर्फे उलटतपास विधीज्ञ श्री. ए.एम. माणगावकर यांचे मार्फत.

०२. आम्ही घटना घडलेल्या रात्रीच्या दुसऱ्या दिवशी सकाळी पोलीस स्टेशन येथे गेलो. रात्री माझ्या भावावर उपचार केले नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, आमच्या गावात

आरोग्य प्राथमिक उपकेंद्र आहे. हे म्हणणे खरे आहे की, आमच्या घरापासून देवगड हे अंतर १० ते १२ कि.मी. आहे. हे म्हणणे खरे आहे की, आमच्या गावात तसेच वाडीत रिक्षा व दुचाकी वाहने आहेत.

०३. हे म्हणणे खरे आहे की, रस्त्याला लागून दिनेश टेंबुलकर याचे घर आहे. हे म्हणणे खरे आहे की, दिनेश टेंबुलकरच्या मागच्या बाजूला आमचे घर आहे. हे म्हणणे खरे आहे की, दिनेश टेंबुलकर याच्या घराला लागून विनोद, प्रल्हाद व प्रमोद टेंबुलकर यांची घरे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, रस्त्यापासून विनोद, प्रल्हाद, प्रमोद व दिनेश यांची घरे जवळ आहेत तर आमचे घर लांब आहे. घटना साधारण २० मिनीटे सुरु होती. आमच्या घरातील लोकां व्यतिरीक्त अन्य लोक घटनास्थळी जमले नव्हते. एम.ओ.नं.१ येथील फळी सागर याच्या उजव्या हातात होती. टॉर्च सागर याच्या डाव्या हातात होता. एम.ओ.नं.१ येथील फळीचा निमुळता भाग सागर याच्या हातात होता.

०४. हे म्हणणे खरे नाही की, माझया भावाला आरोपी यांनी मारहाण केली, शिवीगाळ केली, आम्हाला घरी येऊन जिवे मारण्याची धमकी दिली हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, भावाच्या सांगण्या वरुन खोटा जबाब दिला असून आज मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

सही/-

(श्रीकांत एस. पचंडी)
न्यायंडाधिकारी वर्ग-१, देवगड

दि.३०/०६/२०२६